महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!


महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार






छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१ वे | दिनांक : ०९/०१/२०२६ | वार : शुक्रवार


## ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो : तर महापाप करणारा महापौर; मुख्यमंत्र्यांचे मिश्किल विधान



**नागपूर** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. नागपूर येथे गेले असताना एका मुलाखतीत त्यांना त्यांच्या नगरसेवकाच्या काळातला किस्सा विचारण्यात आला, यावर फडणवीसांनी एक मजेशीर किस्सा सांगितला. तसेच महापौर आणि नगरसेवकाचा जॉब एकदम टफ असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो आणि ज्याने महापाप केले तो महापौर होतो, असेही फडणवीस यांनी गंमतीने विधान केले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी २१ व्या वर्षी नगरसेवक झालो. त्या दिवशी रात्री उशिरापर्यंत मिरवणुका वगैरे काढल्या आणि पहाटे ४ वाजता मी आमच्या घराच्या हॉलमध्ये झोपलो. आणि सकाळी ७ वाजताच घराची बेल वाजली. मी दरवाजा उघडला आणि समोर एक गृहस्थ उभे होते. मी त्यांना विचारले इतक्या सकाळी सकाळी कसेकाय? त्यावर म्हणाले, माझे गटार चोक झाले आहे म्हणून तक्रार करण्यासाठी तुमच्याकडे आलो. त्या दिवशी आपण काय स्वीकारले आहे हे मला समजले.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी गमतीने म्हणतो की, ज्याने मागच्या जन्मी पाप केले तो नगरसेवक होतो आणि ज्याने महापाप केले तो महापौर होतो. पण मला असे वाटते की तेव्हाच्या महानगरपालिकेत आणि आताच्या महानगरपालिकेत खूप फरक पडला आहे. तेव्हा नागपूर शहर विकासाची आस बघत होते. मी महापौर झालो तेव्हा नागपूरमध्ये पाण्याच्या आठ टाक्या होत्या, आज १०८ पाण्याच्या टाक्या आहेत. हा नागपूरमधला बदल आहे. आज नागपूर एक आधुनिक शहर म्हणून बघायला मिळत आहे.

आमचा तो काळ होता जेव्हा नगरसेवक फक्त गटर, रस्ता आणि दिवे याचा विचार करायचा. तेव्हा अक्षरशः स्पर्धा लागायची की जो स्टोअर किपर असायचा, ज्याच्याकडे ते सगळे दिवे ठेवलेले असायचे, त्याला पटवून तो दिवा लावण्याचे एक दिव्य होते. आता या सगळ्या गोष्टी कराव्या लागत नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

तेव्हाच्या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या नसत्या तर देवेंद्र फडणवीस नगरसेवक झाले नसते, यावर बोलताना त्यांनी सांगितले की, हे खरे आहे. मला ज्यावेळी सांगितले की या वॉर्डमधून लढायचे आहे. त्यावेळी मी कोणाला सांगितले नाही की माझे वय झाले नव्हते, माझे वय पूर्ण व्हायचे बाकी होते. पण तेव्हा ती निवडणूक काही कारणांमुळे पुढे ढकलली गेली आणि माझे वय त्या निवडणुकीसाठी भरले, असा किस्सा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.


प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## अर्ज फेटाळलेल्या उमेदवारांना न्यायालयाचा दिलासा

**मुंबई** : पुढील आठवड्यात होणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीसाठी अर्ज फेटाळण्या गेलेल्या इच्छुक उमेदवारांना आता उच्च न्यायालयाकडून संधी मिळण्याची शक्यता आहे. विविध कारणांमुळे बाद ठरवण्यात आलेले अर्ज पुन्हा स्वीकारले जावेत, या मागणीसाठी उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली असून, प्रकरणाचे गांभीर्य ओळखून न्यायालयाने यावर शुक्रवारी तातडीने सुनावणी घेण्याचे निश्चित केले आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीच्या विभाग क्रमांक १ ते २२७ च्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आणि आयुक्तांनी उमेदवारांचे अर्ज फेटाळल्याच्या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली हे अर्ज बाद करण्यात आल्याचा संशय याचिकाकर्त्यांनी व्यक्त केला असून, अर्ज भरण्यासाठी दिलेली सात दिवसांची मुदत अत्यंत अपुरी असल्याचा दावाही या याचिकेत करण्यात आला आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास सहमती दर्शवत हे प्रकरण शुक्रवारी सूचीबद्ध केले आहे.

प्रतिज्ञापत्रे किंवा प्रश्न-उत्तर पत्रके योग्य स्वरूपात नसल्याच्या अथवा कायदेशीररीत्या आवश्यक नसलेली पोलीस, पाणी, कर, मलनिस्सारण आणि मालमत्ता यासह पाच विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) सादर करण्यात अयशस्वी झाल्याच्या कारणास्तव कारणास्तव अनेक इच्छुक उमेदवारांचे अर्ज फेटाळण्यात आले होते. परंतु, पाणी, मालमत्ता कर आणि बांधकाम प्रस्ताव यासारखे विभाग महानगरपालिकेच्या थेट प्रशासकीय नियंत्रणाखाली असल्याने ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी मनमानी, अवाजवी आणि घटनेच्या समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. तसेच विरोधी पक्षांच्या उमेदवारांना ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यास विलंब करून राजकीय कटकारस्थान होण्याची शक्यताही याचिकाकर्त्यांनी वर्तवली आहे.

वांद्रे पूर्व येथील मोझम अली मीर यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेत निवडणूक अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले असून, किरकोळ आणि तांत्रिक कारणांचा आधार घेऊन विरोधी पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज मनमानीपणे फेटाळल्याचा दावा केला आहे. अधिकाऱ्यांची ही कृती असंवैधानिक आणि अरेरावीची असून, यामुळे अनेक इच्छुकांना निवडणूक लढवण्याच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहावे लागले आहे, असे मीर यांनी म्हटले आहे. महापालिका प्रशासनाचा हा पवित्रा राज्य निवडणूक आयोगाच्या घटनात्मक अधिकारांवर गदा आणणारा असल्याची टीकाही या याचिकेतून करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या १२ डिसेंबर २०२५ च्या अधिसूचनेतील अटींमध्ये बदल करून महानगरपालिका प्रशासन आपल्या अधिकारांचा गैरवापर करत असल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. महापालिका ही केवळ अंमलबजावणी करणारी संस्था असतानाही, तिने आयोगाचे विशेष अधिकार डावलून उमेदवारीसाठी स्वतःच्या अटी लादल्या असून, आयोगाने आधी जाहीर केलेल्या कागदपत्रांच्या यादीचे उल्लंघन करून नवीन कागदपत्रांची मागणी केल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

## ना बाण, ना खान : संभाजीनगरात फडणवीसांची नवी घोषणा

**छत्रपती संभाजीनगर** : 'ना बाण, ना खान. आता फक्त भगव्याची शान', अशी नवी घोषणा गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये केली. येथील युती फक्त शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांमुळे तुटली असा दावा त्यांनी केला. सोबतच शहर खड्डेमुक्त करू. संभाजीनगरचा पाणीप्रश्न दोन महिन्यात सोडवू, असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी प्रचार सुरू केला आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर आले असता त्यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला. यात त्यांनी संभाजीनगरच्या विकासासाठी करण्यात आलेल्या योजना तसेच निधींच्या तरतुदीबद्दल माहिती दिली. तसेच शहराच्या विकासाचे नवे व्हीजनही मांडले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, डीएमआयसीमध्ये देखील आपल्याला अधिकची जागा लागणार आहे. दोन एमआयडीसीला जोडण्याचे काम हाती घेतले आहे. २०१५ साली छत्रपती संभाजीनगरच्या रस्त्यांसाठी १०० कोटी दिले होते आणि तेव्हापासून रस्ते आपल्याला मोठे करता येतात ही भावना तयार झाली. आता मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू झाली आहे. शहरातील सगळे डीपी रोड अतिक्रमणमुक्त करणार असल्याचा अजेंडा असणार आहे. तसेच खड्डेमुक्त संभाजीनगर आपल्याला पाहायला मिळेल.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिल्यांदा तर आपल्या सगळ्यांसाठी एक गुड न्यूज आहे की आज आपण पाण्याच्या योजनेच्या पंपाची चाचणी यशस्वी केली आहे. इथला जो पाण्याचा प्रश्न होता, मागच्यावेळी मी मुख्यमंत्री होतो तेव्हा आपण एका झटक्यात १६०० कोटींची योजना आपण मंजूर केली होती. तसेच अनुदानावर ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर उद्धव ठाकरेंची सत्ता आल्यानंतर या योजनेचा खोळंबा झाला. आता ही योजना २७०० कोटींची झाली असून पुढील २ महिन्यात पाण्याचा प्रश्न सुटेल.

औद्योगिक विकासासोबत आपल्याला अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर देखील सुरू विकसित करावे लागणार आहे. २०१४ साली मोदीजी जेव्हा सत्तेवर आले तेव्हा शहराच्या विकासावर काम करण्यास सुरू केले. संभाजीनगर सारख्या शहराला पूर्वी निधी मिळत नव्हता, आता शहरांच्या विकासासाठी निधी पुरवठा केला जात आहे. तसेच जोपर्यंत शहराचा आर्थिक विकास होत नाही, तोपर्यंत अर्बन इनफ्रास्ट्रक्चर कोपअप होत नाही. या औद्योगिक विकासामुळे संपूर्ण शहराचा विकास होणार आहे, असे आश्वासन देखील देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ९ जानेवारी २०२६


## इंग्रजी विषयाची भीती आता होणार दूर; इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'मिशन फुलमार्क्स' अंतर्गत मार्गदर्शन



**जळगाव :** येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'मिशन फुलमार्क्स' या विशेष उपक्रमांतर्गत दहावीच्या (SSC) विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषय मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या सत्रात प्रसिद्ध इंग्रजी विषय तज्ज्ञ श्री. गणेश बच्छाव (आर.पी. ब्रिटिश कौन्सिल) यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेतील यशासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.श्री.बच्छाव यांनी एलसीडी (LCD) प्रोजेक्टरच्या साहाय्याने इंग्रजी विषयातील क्लिष्ट संकल्पना अत्यंत सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. 'ॲक्टिव्हिटी शीट'मधील बारकावे आणि 'लेखन कौशल्य' सुधारण्यासाठी त्यांनी विविध उदाहरणे दिली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक स्पष्टपणे समजण्यास मदत झाली. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांवर असणारा ताण कमी करण्यासाठी सरांनी 'वेळेचे व्यवस्थापन' या विषयावर विशेष भर दिला.अवघड प्रश्नांना आत्मविश्वासाने कसे सामोरे जावे आणि कमी वेळेत अचूक उत्तरे कशी लिहावीत, याबद्दलच्या व्यावहारिक टिप्स त्यांनी यावेळी दिल्या.या मार्गदर्शन सत्राचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग. प्रश्नोत्तरांच्या तासात विद्यार्थ्यांनी इंग्रजी व्याकरण, निबंध लेखन आणि इतर शंकांचे निरसन करून घेतले.या संवादामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी विषयाची भीती कमी झाल्याचे दिसून आले.इकरा पब्लिक स्कूलच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मिशन फुलमार्क्स' या श्रृंखलेचा मुख्य उद्देश एसएससी बोर्ड परीक्षेत विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त गुण मिळवून देणे हा आहे. या यशस्वी कार्यक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन आणि पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## "मुले रंगली काव्यात" चा २०० वा प्रयोग पूर्ण



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** प्रसिध्द साहित्यिक तथा कलावंत शिक्षक अय्युब पठाण लोहगावकर यांचा धमाल विनोदी एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रम " मुले रंगली काव्यात " या एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे २०० वा प्रयोग नुकताच साजापूर येथील उच्च प्राथमिक व प्राथमिक शाळा साजापूर येथे पार पडला आहे. " मुले रंगली काव्यात " या कार्यक्रमात शालेय मुला-मुलींसाठी सांस्कृतिक कार्यक्रमातून गेल्या २५ वर्षापासून संभाजीनगर जिल्हयातील विविध शाळा-महाविद्यालयातून मुलांचे प्रबोधन करण्यास व त्यांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास अय्युब पठाण लोहगावकर यांच्यामार्फत करण्यात आले आहे. या कार्याक्रमामध्ये देशभक्तीपर गीते, ऐतिहासिक पोवाडे, गौळणी, विनोदी नकला, पाळणे, भारुडे, शालेय क्रमिक पुस्तकातील कवितांना चालीवर गाऊन दाखविणे, विनोदी बातमीपत्र सादर करून मुलांना भरपूर हसविणे. आणि कार्यक्रमाच्या शेवटी " आई " ही कविता शिवरंजनी रागातून गाऊन अय्युब पठाण यांनी आपल्या मधूर आवाजाने मुला-मुलींना करुणरसातून रडविलेले आहे. या प्रमाणे दोनतासांची कार्यक्रमाची ही रूपरेषा आहे. या अशा संगीतमय व विनोदी संवादामुळे गाजलेला कार्यक्रम। " मुले रंगली काव्यात " ला शाळेतील मुला-मुलांची कार्यक्रमाला वाढती पसंती व लोकप्रियता मिळालेली असून नुकतेच तिचे २०० वा प्रयोग यशस्वी संपन्न झालेले आहे. जर कोणत्याही शाळेवर "मुले रंगली काव्यात " हा कार्यक्रम हवे असेल तर ( इयत्ता ५ वी ते १२ पर्यंत ) ह्या कार्यक्रमासाठी मो. ९७६४३५०३७४ या क्रमांक अय्युब पठाण लोहगावकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## वडनेर येथे मोतीमाता यात्रेनिमित्त क्रिकेट स्पर्धेचे बक्षीस वितरण



**कन्नड (अरुण थोरात) :** वडनेर ता.कन्नड येथे मोतीमाता यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रथम पारितोषिक यशोदाबाई लक्ष्मण पवार यांच्या प्रतिनिधी सोनू पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यात प्रथम बक्षीस विजेता संघ रिठी, द्वितीय पारितोषिक वडनेरचे भूमिपुत्र तसेच कन्नड नगरपालिकेचे नगरसेवक रवीभाऊ राठोड यांच्या हस्ते देण्यात आले. तृतीय पारितोषिक वडनेर चे सरपंच मूलचंद पवार व गोकुळ राठोड यांच्या हस्ते, तर चतुर्थ पारितोषिक संतोष गांगुर्डे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.यावेळी आंबा येथील प्रकाश चव्हाण, अंबाला येथील शिवाजीभाऊ आगिवले, चुनीलाल राठोड, वडनेरचे राजारामभाऊ राठोड, संतोष राठोड, वाल्मीक राठोड, गुलचंद चव्हाण, पुंडलिक राठोड, ग्रामपंचायत सदस्य रामेश्वर राठोड, ग्रामपंचायत सदस्य चांदभाई, संजय गायकवाड, अनिल राठोड, राहुल राठोड, युवराज चव्हाण, पांडे, धीरज राठोड, अन्वर शहा, बाळू पवार, प्रकाश चव्हाण तसेच आयोजक समितीचे सदस्य, गावातील नागरिक व पंचक्रोशीतील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्पर्धेचे आयोजन यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल आयोजक समितीचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. अशा भव्य क्रीडा स्पर्धामुळे ग्रामीण भागातील युवकांना खेळाची संधी मिळून सामाजिक सलोखा वृद्धिंगत होत असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ९ जानेवारी २०२६

# 'पेरणी' हे शेतकऱ्याच्या वेदनेचे समुहगान - दासू वैद्य




**छत्रपती संभाजीनगर :** 'पेरणी' या कवितासंग्रहाचे कवी ज्ञानेश्वर गायके हे कृषी संस्कृतीत वाढलेले आहेत. त्यांची कविता व्यक्तीचे नव्हे तर समूहाचे प्रतिनिधित्व करते. कवी समूहाबद्दल लिहितोय, 'पेरणी' हे शेतकरी वेदनेचे समुहगान आहे,असे प्रतिपादन ख्यातनाम कवी डॉ. दासू वैद्य यांनी केले. सावित्रीबाई वामनराव जोशी पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्या. अंबादासराव जोशी होते. याप्रसंगी व्यासपीठावर साहित्यिक डॉ. विनोद सिनकर, डॉ. राजशेखर बालेकर उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर येथील जीवन विकास ग्रंथालयातर्फे दरवर्षी मराठवाड्यातील लेखकाच्या पहिल्या साहित्यकृतीला कै.सावित्रीबाई वामनराव जोशी पुरस्कार दिला जातो. यावर्षी हा पुरस्कार कन्नड येथील कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या 'पेरणी' या कवितासंग्रहाला मिळाला. बुधवार दि. 7 जानेवारी रोजी जीवन विकास ग्रंथालयाच्या भा. बा. आर्वीकर सभागृहात सुप्रसिद्ध कवी दासू वैद्य यांच्या हस्ते रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानचिन्ह, गौरवपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गौरवपत्राचे वाचन नृसिंह कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालयाचे कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर यांनी केले. प्राचार्य जीवन देसाई, महेश बावस्कर आणि अशोक लाटे यांच्या हस्ते व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. डॉ. विनोद सिनकर यांनी परीक्षक म्हणून मनोगतातून 'पेरणी' कवितासंग्रहाच्या निवडीमागची भूमिका मांडली. कवी ज्ञानेश्वर गायके यांनी मनोगतातून आपल्या लेखणीचा मोठा सन्मान झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. याप्रसंगी जोशी कुटुंबियांचे प्रतिनिधी ॲडव्होकेट अरविंद जोशी, डॉ. छाया महाजन, डॉ. शाहू पाटोळे, कैलास अतकरे, जीवन कुलकर्णी, गुलाबराव मगर, डी. बी. देशपांडे, अनिल बाविस्कर, नितीन कंधारकर, प्रिया धारूरकर यांच्यासह साहित्य क्षेत्रातील मान्यवर, ग्रंथालय कार्यकारिणी सदस्य, वाचक, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्रीकांत उमरीकरयांनी केले.

# डॉ. यशवंत पवार राज्यस्तरीय दर्पणरत्न जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड येथे वैद्यकीय सांस्कृतिक सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत जयकाली सांस्कृतिक मंडळ कन्नड चे अध्यक्ष डॉ.यशवंत दत्तात्रय पवार यांना राज्यस्तरीय दर्पण रत्न जीवनगौरव पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले.पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.०६ जानेवारी रोजी मलकापूर जि.बुलढाणा येथे 'राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्कार २०२६' हा भव्य सोहळा अत्यंत दिमाखात संपन्न झाला. हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने मलकापूर जि.बुलढाणा येथील मराठा मंगल सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ ९००१, २०१५ प्रमाणित हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात आला. दर्पण रत्न पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलेश तायडे सहा. माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई कार्यक्रमाचे उद्घाटकडॉ. प्रा. अनिल खर्चे(प्राचार्य व्ही. बी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज), तर प्रमुख पाहुणे धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, सुभेदार दिनेश तायडे कारगिल योद्धा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. डॉ.यशवंत पवार हे कन्नड शहरात गेली ४० वर्ष आरोग्य सेवा देत असतांनाच नाट्य चळवळ, सांस्कृतिक, साहित्य, क्रिडा, पर्यावरण, लोकसंख्या नियंत्रण, एडस जनजागृती , व्यक्तिमत्व विकास, आदी क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. समाजातील अंधश्रद्धा दुर व्हाव्या म्हणुन ३० वर्षापासून कार्यरत आहेत, नाट्य चळवळीच्या माध्यमातून हजारो युवक-युवतींना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. तर हजार पेक्षा जास्त नाट्य प्रयोग सादर करत महाराष्ट्र राज्य शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेत कन्नडला प्रथम क्रमांक मिळाला आहे. पत्रकारीता हा त्यांचा छंद असुन सामाजिक प्रश्नांना ते वाचा फोडत असतात, सध्या ते दै.महाराष्ट्र ग्रामीण आणी दै.शूर मराठा च्या माध्यमातून लेखण करत असतात. या सोबतच सध्या युवकांना संगणक प्रशिक्षण देत असुन शेतकर्यांना खर्च कमी करुन उत्पन्न वाढीसाठी सेंद्रिय शेती चा वापर कसा करावा या बाबत मार्गदर्शन करत आहेत. आतापर्यंत त्यांना केंद्र शासनाचा नेहरु युवा पुरस्कार, लळीत युवा पुरस्कार , मराठवाडारत्न पुरस्कार, समतारत्न पुरस्कार, अंधश्रद्धा निर्मूलन पुरस्कार, असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. या पुरस्काराबद्दल त्यांचे डॉ.सतिष वैष्णव( छत्रपती संभाजीनगर), डॉ.रमेश सुर्यवंशी, प्रा.रंगनाथ लहाणे, राजेंद्र जगधणे (श्रीरामपूर), श्याम दंडवते( राहाता), विलास हासे ( संगमनेर), अशोक पवार, दिग्विजय पवार, सौ.अनिता पवार, डॉ.केशव शिरसे, डॉ.पी.ए झगरे, डॉ.प्रकाश नागणे, इंडियाग्रोचे सल्लागार स्वप्निल नेव्हे, यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# कवितासंग्रह पाठविण्याचे आवाहन

**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड तालुक्याला समृद्ध व वैभवसंपन्न ऐतिहासिक, नैसर्गिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. कन्नड तालुक्यात साहित्यिक चळवळ अधिकाधिक गतिमान होऊन सातत्याने विविध वाङ्मयीन, सांस्कृतिक उपक्रम संपन्न होत आहे. तिफण कविता महोत्सवाच्या माध्यमातून अनेक नवोदित कवी लेखन करित आहेत. कन्नड हे कवितेचे गाव म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. कन्नड येथे शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या पुढाकाराने प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कवितेचे ग्रंथालय साकारत असून या ग्रंथालयाचा उपयोग कवितेचे अभ्यासक, विद्यार्थी, वाचक, संशोधक आणि काव्यप्रेमी नागरिकांना व्हावा, कवितेचे एक संदर्भ ग्रंथालय म्हणून त्याचा उपयोग व्हावा, या महत्वपूर्ण उद्देशाने हे आगळे वेगळे ग्रंथालय सरकारत आहे. या कवितेच्या ग्रंथालयात महाराष्ट्रातील व महाराष्ट्रा बाहेरील नवोदित व मान्यवर कविंचे कवितासंग्रह ठेवण्यात येणार आहे. ग्रंथानुदानातून हे ग्रंथालय साकारत असून कविंनी आपले स्वलिखित किंवा आपणाकडे संकलित असलेले कवितासंग्रह भेट स्वरूपात प्रा. डॉ. शिवाजी हुसे, प्रमुख, मराठी विभाग व संशोधन केंद्र , शिवाजी महाविद्यालय, कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर - ४३ ११ ०३ या पत्यावर पाठवावे, असे आवाहन समन्वयक डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ९ जानेवारी २०२६


## सोशल मिडीयचा वापर करतांना मुलींनी काळजी घ्यावी- पोनि कुणाल सूर्यवंशी




**कन्नड (अरुण थोरात) :** हल्ली मुलांमध्ये अँड्रॉइड फोन वापराचा कल वाढला आहे. त्यावर व्हाटअप, इंस्टाग्राम, फेसबुक सारख्या सोशल मीडियावर मुले आपले अकाउंट सुरु करून, आपले खाजगी फोटो किंवा माहिती शेअर करतात. यामुळे मुलांची फसवणूक होऊ शकते. विशेषतः मुलींनी सोशल मिडीयचा वापर करताना काळजी घेण्याचा सल्ला कन्नड शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांनी मुलांना दिला.गुरुवारी (ता. ०८) सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय कन्नड येथे पोलिस स्थापना दिनानिमित्ताने लोकजनजागृती सुरक्षा सप्ताह च्या अनुषंगाने ते बोलत होते. यावेळी मार्गदर्शन करताना कुणाल सुर्यवंशी म्हणले की,विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पोलिस हे आपले मित्र म्हणून काम करतात.समाजात शांतता व सुव्यवस्था ठेवतानाच सदरक्षणाय खलनिग्रहणाय हे बीद्रवाक्य घेवून काम करतात. समाजात मोठ्या प्रमाणात सायबर गुन्हे वाढत चालले आहेत.त्याला अटकाव करण्यासाठी सर्व जनतेने सायबर सुशिक्षित होणे गरजेचे आहे.यावेळी विविध हेल्पलाईन क्रमांक त्यांनी विद्यार्थ्यांना दिले त्यात १९३०, ११२, १०९८ हे क्रमांक नागरिकांना अडचणीच्या काळात उपयुक्त ठरतात. यावेळी संजय जाधव यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना झाले. या कार्यक्रमासाठी प्राचार्या सुनिता दळवी, प्रा.विजय भोसले, गोपनीय अंमलदार प्रदीप चव्हाण, संग्राम देशमुख, अजित खंबाट, आकाश शिरसाठ हे उपस्थित होते. प्रास्तविक व सूत्रसंचालन प्रा.गणेश विसपूते तर आभार प्रदर्शन प्रा.रामनाथ टेकाळे यांनी केले.

## जीवन विकास ग्रंथालयाला 'अ' वर्ग पुरस्कार



**पैठण :** पैठण येथे होतं असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रंथालय संघ अधिवेशनात देवगिरी बँकेच्या सहकार्याने दिला जाणारा अ वर्ग ग्रंथालय पुरस्कार नगराध्यक्ष विद्याताई भूषण कावसानकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ग्रंथालय कार्यकारिणी सदस्य संगीता मंडलिक, भाग्यश्री आर्वीकर व सहाय्यक ग्रंथपाल लक्ष्मण मोरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ, छत्रपती संभाजीनगर यांचे ५० वे आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा ग्रंथालय संघाचे ४७ वे संयुक्त वार्षिक अधिवेशनात हे पुरस्कार वितरण संपन्न झाले. याप्रसंगी पाचोड चे युवा सरपंच शिवराजभैय्या भुमरे व राज्यातील ग्रंथालय अध्यक्ष आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.जीवन विकास ग्रंथालयाचे अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी, कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर यांचे विविध संस्थाकडून अभिनंदन होत आहे.

## शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे लेखक आपल्या भेटीला कार्यक्रम संपन्न




**कन्नड (प्रतिनिधी) :** भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमा अंतर्गत दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि. एन. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय विभाग आणि मराठी विभाग यांच्या वतीने 'लेखक आपल्या भेटीला' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रसिद्ध कवी श्री ज्ञानेश्वर गायके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रो.डॉ.शिवाजी हुसे तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांनी केले. यावेळी प्रसिद्ध कवी श्री ज्ञानेश्वर गायके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'कोणतेही लिखाण करण्यासाठी अगोदर मोठ्या प्रमाणात वाचन करणे गरजेचे' आहे या अंगाने त्यांनी विविधांगी वाचन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच 'लेखनाची सुरुवात कशी करावी' यावरही विस्तृत असे मार्गदर्शन केले. मी सामान्य विद्यार्थी ते प्रसिद्ध कवी कसा घडलो हा जीवन प्रवास आपल्या मनोगतात व्यक्त केला. कोणते वाचन साहित्य, कविता वाचावे, लेखन कसे करावे या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रा. प्रगती चव्हाण प्रा.अमोल सरवदे, प्राध्यपक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आपत्ती व्यवस्थापनात उपाययोजना, प्रतिसाद व पुनर्वसन महत्वाचे - डॉ. उमाकांत सूर्यवंशी




**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील मौजे कदेर येथे श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिरात आज तिसऱ्या दिवशी बौद्धिक व्याख्यानात "आपत्ती व्यवस्थापन " या विषयावर प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.किसन लोहार , प्रा,डॉ. व्ही.एस.होगाडे,प्रा.एस.डी.कोडे,कार्यक्रम अधिकारी,डॉ.बालाजी कोनाळे हे उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सकाळपासून मौजे कदेर गावात विविध प्रकारची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.त्यात लोकमान्य टिळक विद्यालयाच्या परिसरातील तन काढणे,गटारी साफ करणे,झाडाना आळे करणे,सांडपाण्याची व्यवस्था लावणे,तुंबलेल्या नाल्यातून पाणी काढून देणे आदी कामे केल्याचे अहवाल वाचन झाले.त्यानंतर प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरुवात झाली.प्रा.डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी अतिशय सविस्तरपणे आपत्ती व्यवस्थापनाविषयी माहिती दिली.ते म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन म्हणजे नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीचा मानवी समाजावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीदरम्यान प्रतिसाद आणि आपत्तीनंतरची पुनर्प्राप्ती यासारख्या सर्वसमावेशक शास्त्रीय उपाययोजना करणे, म्हणजेच आपत्ती व्यवस्थापन होय. यात जीवित व मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी नियोजन ,समन्वय आणि कृतीकार्यक्रम यांचा समावेश असतो.आपत्ती व्यवस्थापनाची मुख्य उद्दिष्टे ही आपत्तीचा प्रभाव कमी करणे जीवित हानी मालमत्तेचे नुकसान टाळणे समुदायांची लवचिकता वाढविणे आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी समन्वय साधने होय आपत्ती व्यवस्थापन साधारणपणे चार टप्प्यात केले जाते क्षमण तयारी प्रतिसाद व पुनरप्राप्ती यात आपत्तीची तीव्रता आणि जोखीम कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आपत्कालीन योजना तयार करणे प्रशिक्षण देणे आणि नवीन संसाधने उपलब्ध करणे आपत्तीनंतर तात्काळ अन्न वस्त्र निवारा व वैद्यकीय मदत पुरविणे त्याचबरोबर बाधित भागाचे पुनर्वसन करणे आणि जनजीवन पुन्हा सुरळीतपणे पूर्ववत करणे म्हणजेच आपत्ती व्यवस्थापन होय आपत्तीला तोंड देण्यासाठी एक सोनयोजित आणि एकत्रित दृष्टिकोन निर्माण करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, ज्यामध्ये प्रतिबंध ,तयारी, प्रतिसाद आणि पुनर्प्राप्ती यांचा समावेश होतो. खरे तर आपत्ती दोन प्रकारची असते एक नैसर्गिक आपत्ती ,यात अतिवृष्टी, महापूर ,भूकंप ,सुनामी ,वादळे, दरड कोसळणे ,हो, मानवी अविचार ,नैसर्गिक रोगराई ,वनवे, ज्वालामुखी ,उद्रेक ,उल्का, वीज कोसळणे ,अवर्षण इत्यादीचा समावेश होतो तर मानवनिर्मित आपत्तीमध्ये चेंगराचेंगरी, आग लागणे ,घरगुती अपघात, वायू गळती ,इमारत कोसळणे ,रेल्वे अपघात, हवाई अपघात, जलवाहतूक अपघात, युद्ध, अतिरेकी कारवाया किंवा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केलेली विविध गुन्हे अशा प्रकारच्या विविध संकटावर मात करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन ही संकल्पना विकसित झाली आहे. "आपत्ती व्यवस्थापन " या व्याख्यानाचे अध्यक्ष प्रा. डॉ. किसन लोहार यांनीही विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन समजून घेऊन त्यात आपला सहभाग नोंदवला पाहिजे असे सांगितले.भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येक व्यक्तीस आपल्या जीवित आणि मालमत्ता सुरक्षित राखण्याचा अधिकार दिला आहे त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षितता राखणे हे प्रत्येक व्यक्ती आणि संस्थेचे मूलभूत कर्तव्य असल्यामुळे सहाजिकच आपत्ती निवारण्याची जबाबदारी शासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे आपत्ती व्यवस्थापन कायदा २०२५ नुसार सातत्यपूर्ण व एकात्मिक नियोजन प्रक्रिया व्यवस्थित रचना ,सहकार्य आणि आपत्तीच्या संभाव्य धोक्याला प्रतिबंध घालणे या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन ही सबंध प्रक्रिया समजून घेणे आणि एक व्यक्ती म्हणून ,नागरिक म्हणून त्यात आपल्या दृष्टीने काय योगदान देता येऊ शकते याचा विचार करून आपला सहभाग नोंदवणे आणि त्यात सक्रिय राहणे अगत्याचे आहे.असे सांगून डॉ.लोहार यांनी अध्यक्षीय समारोप केला.श्रमपरिहार झाला त्यानंतर दुपारी दोन वाजता "आपत्ती व्यवस्थापन" या बौद्धिक व्याख्यानास सुरुवात झाली.या सबंध कार्यक्रमाचे नेतृत्व व सूत्रसंचालन शिबिरातील विद्यार्थिनी प्रतिनिधी कू.आकांक्षा म्हेत्रे हिने केले तर कार्यक्रमाचे आभार कु.स्वाती शिंदे हिने व्यक्त केले.या कार्यक्रमास गावातील बहुसंख्य नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यापीठ गीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ९ जानेवारी २०२६


## श्री. एस.एन. कुलकर्णी आणि एम. जी. जोशी यांचे प्रेरणादायी अनुभव कथन.



**जालना :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या गोंदेगाव निवासी शिबिरात आज ८ जानेवारी २०२६ रोजी दुपारच्या बौद्धिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना संबोधित करताना इंजिनीयर श्री. एस.एन. कुलकर्णी म्हणाले की, जीवन अतिशय सुंदर आहे. आपल्याकडे काय नाही त्यापेक्षा जे आहे त्याचा उपयोग करून जीवन सफल केले पाहिजे. जीवनात अनेक संकटे येत असतात त्यावर मात करायला शिकले पाहिजे. श्रमाच्या व जिद्दीच्या बळावर यश प्राप्त करता येते. विद्यार्थ्यांनी बहुश्रुत असले पाहिजे. ज्ञानाच्या क्षेत्रात कोणी लहान मोठा नसतो. इतरांकडून जेवढे घेता येईल तेवढे घेता आले पाहिजे. असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. याप्रसंगी त्यांनी आपल्या जीवनातील विविध अनुभव सांगून विद्यार्थ्यांना संबोधित केले.याप्रसंगी श्री. एम.जी. जोशी यांनीही शैक्षणिक व सामाजिक जीवनातील अनेक अनुभव, उदाहरणे विनोदी शैलीत सांगुन विद्यार्थ्यांनी नेहमी सजग राहण्याचा सल्ला दिला. अध्यक्षीय समारोपात प्रा. शशिकांत चौधरी यांनी आई व मुलाच्या नातेसंबंधावर कविता सादर करून विद्यार्थ्यांना अंतर्मुख केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. उद्धव थोरवे प्रा.अभिजीत भुतेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन आदित्य सोनवणे यांनी केले. आभार विवेक खरात यांनी मानले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## डॉ. नीरज बोरसे यांना बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघातर्फे दिला जाणारा आंतरराष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयाचे नाट्यशास्त्र विभागप्रमुख, नाट्यप्रशिक्षक. रंगकर्मी यांना नाशिक येथील. दर्पणकार पत्रकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघातर्फे दिला जाणारा "आंतरराष्ट्रीय अचिव्हर्स पुरस्कार"( International Achievers Award) डॉ.नीरज बोरसे यांना आज शिर्डी येथे सन्मानपूर्वक नगर जिल्ह्याची माहिती अधिकारी श्री. सुरेश पाटील. श्री गोरक्ष गाडीलकर मुख्य कार्यकारी अधिकारी, शिर्डी पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर महेंद्र देशपांडे, पोलीस अधीक्षक वाघचौरे उपस्थितीत प्रदान करण्यात आला. त्यांच्या गेल्या वीस वर्षाहून अधिक नाट्यकलेच्या आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी हा पुरस्कार देण्यात आला. डॉ.नीरज बोरसे यांनी बालरंगभूमी ते महाविद्यालयीन रंगभूमीवर उत्तमरीत्या कामे केलेली आहेत. ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठाचे ते माजी विद्यार्थी असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एम. पी. ए. नाट्यशास्त्र विषयाचे सुवर्णपदक त्यांनी प्राप्त केले आहे. अमोल पालेकर दिग्दर्शित ध्यास पर्व या चित्रपटात भूमिका, 'पुणा मसाला' या क्रांती कानडे दिग्दर्शित चित्रपटासाठी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम. सोनी टीव्हीवर युअर ओनर या मालिकेसाठी सहाय्यक दिग्दर्शक ते प्रमुख सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम. तसेच कोदंण लघुचित्रपट, पथनाट्य, 'माणूस होण्याची रंगशाळा' या संस्थेचे ते संस्थापक आहेत. 'विश्वभारती विद्या प्रसारक समाज' व 'प्रभाकर नाट्य संस्कार' या संस्थेचे उपाध्यक्ष आहेत. आणि 'क्षितिज' या संघटनेचे ते सदस्य असून वैदिक संस्कृती टिकवण्यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत. 'अथांग' नाट्य संस्थेचे ते प्रमुख पदाधिकारी आहेत. दिनकर देशपांडे लिखित 'हं,हं आणि हं...हं...हं' आणि 'निम्मा सीमा राक्षस'या बालनाट्याचे दिगदर्शन केले आहे. त्यांनी नाटककार सतीश आळेकर यांच्या संपूर्ण नाटकांवर संशोधन केलेले आहे.त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली असून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सेमिनार, कार्यशाळा सहभाग घेतला आहे. १८ संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत. जाणिवा, सकाळ करंडक, लोकसत्ता लोकांकिका, पु .ल. देशपांडे करंडक ,महापौर करंडक, पुरुषोत्तम करंडक स्पर्धेमध्ये बक्षिसे मिळवली आहेत. तळागाळातील विद्यार्थ्यांमधील उपजत कलागुणांना वाव देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील, धडपडत असतात. त्यांनी 'महानिर्वाण', 'मुक्तधारा' ,'काच कि दिवार', 'सामना' ,'नशीबवान बाईचे दोन' ,'आळशी अत्तर वाल्याची गोष्ट', 'वळण', 'सामना','आम्ही सगळे', 'मुलगी झाली हो', 'रंगलेल्या गालाचा मुका' या नाटकांचे दिग्दर्शन केले आहे. त्यांनी 'सीतास्वयंवर, नागमंडल, मुक्तधरा ,अजगर आणि गंधर्व, सदू आणि दादू ,स्वप्न बघायचंय क्लिक,डम वेटर, हॅम्लेट अशा विविध नाटकांमधून उत्तम भूमिका केलेल्या आहेत ते म्हणतात 'माझी लढाई पुरस्कारांसाठी नाही तरंग संस्कारांसाठी आहे' त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे सरचिटणीस श्री.सतीश चव्हाण , प्रा. बाळासाहेब बोरसे, प्राचार्य प्रोफेसर रवी पाटील, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, उपप्राचार्य डॉ.गणेश मोहिते, नाट्यशास्त्र विभाग प्रमुख पंडित गुरु पार्डीकर महाविद्यालय प्रोफेसर डॉक्टर चंद्रशेखर कणसे डॉ .अतुल पवार. डॉ .राजेश लहाने. डॉ. अंबादास आरगडे यांनी अभिनंदन केले आहे .

## ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे 'कर्करोग जनजागृती अभियान' उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा येथे शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'कर्करोग जनजागृती अभियान' अत्यंत प्रभावीपणे पार पडले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये कर्करोगाविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाचे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे हे होते.तज्ज्ञांचे मार्गदर्शनया प्रसंगी शासकीय कर्करोग रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर डॉ. सुयश डिग्गीकर, डॉ. चैतन्य ढवळे आणि डॉ. स्नेहा गुन्हाळा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.मुख्य मार्गदर्शक डॉ. सुयश डिग्गीकर यांनी आपल्या भाषणात कर्करोगाची लक्षणे, या आजाराची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय यावर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "योग्य आहार, व्यायाम आणि व्यसनांपासून दूर राहिल्यास आपण या महाभयंकर आजाराला रोखू शकतो." तसेच, समाजात पसरलेल्या कर्करोगाच्या चुकीच्या समजुती दूर करून विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांमध्येही जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.उपस्थिती आणि सहभागया कार्यक्रमासाठी समाजसेवा अधीक्षक श्री. भडांगे सर यांची विशेष उपस्थिती होती. या अभियानास शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध शंकांचे तज्ज्ञांनी समाधानकारक निरसन केले.कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक भान निर्माण झाल्याची भावना पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ९ जानेवारी २०२६


## सिंदखेडराजा येथे पत्रकार दिनानिमित्त भव्य पत्रकार सन्मान सोहळा




**बुलढाणा (महेश मुंढे) :** लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचा सन्मानार्थ आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त तालुका प्रशासन सिंदखेड राजा यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनानिमित्त पत्रकार सन्मान सोहळा मंगळवार दिनांक ०६/०१/ २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता पोलीस ठाणे सिंदखेड राजा येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी मा. प्रा. संजय खडसे हे होते तर प्रमुख उपस्थितीत उपविभागीय पोलीस अधिकारी मा. मनीषा कदम मॅडम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले यावेळी तहसीलदार सिंदखेड राजा मा. अजित दिवटे, पोलीस निरीक्षक मा. आशिष इंगळे, तालुका कृषी अधिकारी मा. रामेश्वर भुते, गटविकास अधिकारी मा. अजित कुमार बांगर, मा. संजय मातोंडकर ठाणेदार किनगाव राजा, मा. गजानन करेवाड ठाणेदार साखरखेर्डा, मा. आशिष बोबडे मुख्य अधिकारी नगरपरिषद सिंदखेड राजा आदी मान्यवर उपस्थित होते, कार्यक्रमात तालुक्यातील विविध वृत्तपत्रे व माध्यमांशी संबंधित पत्रकारांचा सन्मान करण्यात आला यावेळी मान्यवरांनी समाज हितासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारांच्या भूमिकेचे कौतुक करत लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी निरभीड पत्रकारिता आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले, या पत्रकार सन्मान सोहळ्याला मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## राजीव गांधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची एमआयडीसी स्कील सेंटरला औद्योगिक क्षेत्र भेट



**छत्रपती संभाजीनगर :** राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथील विद्यार्थ्यांसाठी MIDC स्किल डेव्हलपमेंट सेंटर, शेंद्रा, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक 7 जानेवारी 2026 रोजी यशस्वी औद्योगिक भेट (Industrial Visit) आयोजित करण्यात आली होती.या औद्योगिक भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना उद्योग विश्वाची प्रत्यक्ष ओळख करून देणे, उद्योग उभारणी व संचालनासाठी आवश्यक बाबी समजावून सांगणे तसेच करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करणे हा होता.या भेटीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे आणि डॉ.कालिदास फड,डॉ.किशोर काळे,डॉ.नानासाहेब लावंड, डॉ.अमित राऊत,डॉ. नितीन मुळे,डॉ.सौरभ चव्हान ऊपस्थित होते. यासाठी एकुण 36 (बारावी आणि पदवी स्तरावरील) विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रारंभी MIDC स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या कौशल्य विकास कर्मचाऱ्यांनी उपस्थितांचे स्वागत केले.यावेळी केंद्र व्यवस्थापक श्री.वैभव दरवरे साहेब यांनी केंद्राच्या स्थापनेमागील उद्दिष्टे, सुरू असलेले विविध कौशल्याधारित प्रशिक्षण अभ्यासक्रम, केंद्रातील सुविधा यांची माहिती दिली.औद्योगिक भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना केंद्रातील विविध प्रशिक्षण विभागांसह अत्याधुनिक प्रयोगशाळा (Labs) प्रत्यक्ष दाखविण्यात आल्या. त्या ठिकाणी दिले जाणारे प्रत्यक्ष प्रशिक्षण, वापरली जाणारी यंत्रसामग्री व तांत्रिक सुविधा यांची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.यानंतर केंद्राचे डायरेक्टर डॉ. गिरधारी (जी. एम.) वाघमारे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कौशल्य प्रशिक्षण सर्वांसाठी का आवश्यक आहे, नवीन शैक्षणिक धोरणानुसार कौशल्य शिक्षणाचे महत्त्व, उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये तसेच नोकरी, स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी याबाबत सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी कौशल्य विकास केंद्रात प्रवेश घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांसाठी PPT प्रेझेंटेशनद्वारे प्रशिक्षण प्रक्रिया, उद्योगातील सध्याच्या गरजा व रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन श्री. योगेश काबरा यांनी केले. यावेळी त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट केंद्रामार्फत नोकरीच्या संधी कशा उपलब्ध करून दिल्या जातात, उद्योगांशी असलेला समन्वय, निवड प्रक्रिया व करिअर मार्गदर्शन याबाबत सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे राजीव गांधी कॉलेज, करमाड आणि MIDC स्किल डेव्हलपमेंट सेंटर, छत्रपती संभाजीनगर यांच्यात सामंजस्य करार (MOU) करण्यात आला. या MOU मुळे भविष्यात विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित प्रशिक्षण, औद्योगिक सहकार्य व रोजगाराभिमुख उपक्रम राबविण्यास मोठी मदत होणार आहे.शेवटी चेतन डांगे यांनी सर्व मान्यवर, कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला असून, शिक्षणासोबत कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

## रंगांची सभा

एकदा भरली होती
सभा रंगांची
पण सभेत जुंपली
भांडण सर्वांची

सगळे रंग करू लागले
श्रेष्ठपणाचा दावा
गडबड गोंधळ करत
करू लागले इतरांचा हेवा

लाल रंग म्हणाला
माझाच रंग कुंकाला
पूजा करतांना
आवडतो मी देवाला

निळा रंग म्हणाला
आकाशाला शोभा माझ्यामुळे
क्षितिजापर्यंतचे अस्तीत्व
सर्वांना माझे कळे

हिरवा रंग म्हणाला
निसर्ग खुलतो माझ्यामुळे
हवेच्या मंद तालावर
डोलती हिरवे मळे

काळा रंग म्हणाला
माझ्यामुळे रंगतो फळा
मी रजेवर गेल्यावर
बंद पडेल शाळा

पांढरा रंग म्हणाला
अरे आपण सारे भाऊ भाऊ
कशाला करता तंटा
एकजुटीने सदा राहू



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## दिस पुराचे पाहून

राबतांना बाप माझा
असा घामाघूम होतो
नांगराच्या फाळातूनी
गीत विठ्ठलाचे गातो.

अवकाळी पावसाने
अचानक केला घात
तूच सांग विठूराया.
कसे करू आता मात.

पुरामुळे बाप माझा
असा कासावीस झाला
पीक गेले वाहूनिया
बाप लुटूनिया आला.

बापापुढे प्रश्न आहे
कसे चालवावे चूल
अन्नविना झोपतात
घरी उपाशी रे मुलं.

दुष्काळाच्या झळा आता
कसे सहन करावे
सावकारी कर्ज दादा
काय करून भरावे.

भर दिवसा बापाला
तारे दिसाया लागले
दिस पुराचे पाहून
सारे वाईट वागले.

संकटांशी लढताना
बाप करतो चढाई
जिंकण्याच्या इराद्याने
बाप लढतो लढाई.

मायबाप सरकार
आता विचार करावे
बळीराजा बाप माझा
आता हाताशी धरावे



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com